# N 622

Seat No. | | | | | | | |

2025 VI 25 1100 **-N 622 -** MARATHI (COMPOSITE) (A) (SECOND OR THIRD LANGUAGE) (M)

(REVISED COURSE)

**Time : 2 Hours** **(Pages 12)** **Max. Marks : 40**

**कृतिपत्रिकेसाठी सूचना :—**

(1) सूचनेनुसार आकलनकृती व व्याकरण यांमधील आकृत्या काढाव्यात.

(2) आकृत्या पेननेच काढाव्यात.

(3) उपयोजित लेखनातील प्रश्नांसाठी (सूचना, निवेदन) आकृतीची आवश्यकता नाही. तसेच या कृती लिहून घेऊ नयेत.

(4) स्वच्छता, नीटनेटकेपणा व लेखननियमांनुसार लेखन यांकडे जाणीवपूर्वक लक्ष द्यावे.

## विभाग-1 : गद्य

1\. **(अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) उत्तर लिहा : 1


लेखकाला मिळालेली पदवी – [ ]

माझ्या ग्रंथाला राज्यपुरस्कार मिळाला, माझ्या व्याख्यानमाला गाजल्या, आदर्श प्राध्यापक म्हणून माझा गौरव झाला, मला डी. लिट. मिळाली, राष्ट्रीय प्राध्यापक म्हणून माझा सन्मान झाला, 'संतसाहित्यचिंतना'सारख्या माझ्या पुस्तकाला श्रेष्ठ

P.T.O.

संतसाहित्यविषयक ग्रंथाचा पुरस्कार मिळाला, मला परदेशाची निमंत्रणं आली, की त्या बातम्या सांगणारी जी पत्रं नि तारा माझ्या टेबलावर येऊन पडत, ती पाकिटं फोडून या बातम्या मी प्रथम कुणाला सांगत असे ? काचेच्या खिडकीतून माझ्याकडे टक लावून पाहणाऱ्या मकबऱ्याला ! मग मकबऱ्याचे मिनार मिस्कीलपणे हसत-डोलत. त्याचा घुमट तरारून येई. माझ्या यशानं त्यालाही तेज चढे. त्याच्या स्नेहशील दृष्टीच्या वर्षावात मी अखंड न्हाऊन निघत असे. माझ्या आयुष्यात या स्नेहाळ क्षणांना फार फार मोलाचं स्थान आहे. हे सारे क्षण मी माझ्या हृदयात खोल खोल जपून ठेवले आहेत, दडवून ठेवले आहेत.

**(2)** आकृतिबंध पूर्ण करा : 2




**(3)** **स्वमत :** 3

'मकबरा आणि लेखक' यांच्यातील मैत्रीचे नाते तुमच्या शब्दांत लिहा.

Khan's Academy

(आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :

(1) एका शब्दात उत्तर लिहा : 2

(i) मोराच्या ओरडण्याला म्हणतात – [ ]

(ii) मोराचा आनंदाचा काळ – [ ]


मोराचा केकारव वर्षा ऋतूचे आगमन सुचवणारा आहे. ग्रीष्म ऋतू संपता संपता उष्णता असह्य होते. त्या वेळी येणारा वर्षासूचक केकारव शेतकऱ्यांमध्ये नवीन आशेचा संचार करतो. ती लवकरच येणाऱ्या पावसाची पूर्वसूचना असते. वर्षा ऋतू हा आनंदाचा काल आहे. तळ्याची पाळ, हिरवीगार कुरणे, देवालयाची उंच शिखरे, नदी-नाले, ओहोळाचे काठ ही या वेळी मोराच्या स्वैर विहाराची स्थाने असतात. मोर नेहमी आपल्या निवासस्थानापासून अर्धा ते दोन किलोमीटरच्या परिसरात वावरतो. चारा सापडेल त्याप्रमाणे तो फिरतो. तो आपला चारा दिवसाच शोधतो. काळोख पडण्यापूर्वी तो आपल्या जागेवर येऊन पोहोचतो.

पहाट होताच मोर जागा होतो. ज्या झाडावर त्याने झोप घेतली असेल तिथूनच बसल्या बसल्या तो बांग देतो. थोडा वेळ आपले पंख सावरून तो वरून खाली टेहळणी करतो. सूर्योदयापूर्वी अर्धा तास तो झाडाखाली उतरतो.



Khan's Academy

(2) आकृतिबंध पूर्ण करा : 2




(3) उत्तरे लिहा : 2


(*i*) मोराच्या वावरण्याचा परिसर कोणता ते लिहा.

(*ii*) मोर झाडावरून उतरण्याची वेळ लिहा.

## विभाग–2 : पद्य

**2. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) खालील आकृती पूर्ण करा : 2




Khan's Academy

अरे खोप्यामधी खोपा
सुगरणीचा चांगला
देखा पिलासाठी तिनं
झोका झाडाले टांगला।

पिलं निजले खोप्यात
जसा झुलता बंगला
तिचा पिलामधी जीव
जीव झाडाले टांगला।

खोपा इनला इनला
जसा गिलक्याचा कोसा
पाखराची कारागिरी
जरा देख रे मानसा।

तिची उलूशीच चोच
तेच दात, तेच ओठ
तुले देले रे देवानं
दोन हात दहा बोटं।

(2) दिलेल्या पंक्तीचा सरळ अर्थ लिहा : 2

तिची उलूशीच चोच
तेच दात, तेच ओठ
तुले देले रे देवानं
दोन हात दहा बोटं।

**(आ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा :**

(1) कवितेच्या आधारे योग्य शब्द शोधा व चौकटी पूर्ण करा : 2

(*i*) शेतकऱ्यावर कृपा करणारा – [ ]

(*ii*) शेतकऱ्याच्या साथीला असणारे – [ ]

हे आली रे आली, आली रे आली
सुगी आलीऽऽऽ
मेघराजानं किरपा केली रं
हे भल्लगडी दादा, भल्ल म्हण दादा॥धृ॥

काळ्या मातीला हिरवा सुगंध
या गंधात सारेच धुंद
नवनवतीचा साज हा ल्याली रे॥१॥

नटलं घरदार शिवार सारं
खेळं अंगणी सळसळतं वारं
बहुआनंदाने धरती न्हाली रे॥२॥

दोन हातांची किमया ही सारी
साथीला बैलं माझे खिल्लारी
केली दैवाने दौलत हवाली रे॥३॥

काय कमतरता कोणाला आज
धनी आम्हीच आमचं हे राजं
सान थोरांची चंगळ उडाली रे॥४॥

(2) **दिलेल्या पंक्तीचा सरळ अर्थ लिहा :** 2

काळ्या मातीला हिरवा सुगंध
या गंधात सारेच धुंद
नवनवतीचा साज हा ल्याली रे॥

## विभाग-3 : भाषाभ्यास

3. (अ) **व्याकरण घटकांवर आधारित कृती :**

(1) **सूचनेनुसार सोडवा :**

(*i*) शेवटी एकदाची शर्यत संपली. (काळ ओळखा) 1

(*ii*) मी अनाथांची आई होईन. (काळ ओळखा) 1



Khan's Academy

(2) खाली दिलेले वाक्प्रचार व त्यांचे अर्थ यांच्या जोड्या जुळवा : 2

| वाक्प्रचार | अर्थ |
|---|---|
| (*i*) आकांत माजणे | (अ) निश्चय करणे |
| (*ii*) निर्धार करणे | (आ) आश्चर्यचकित होणे |
| | (इ) खूप दु:ख होणे |

**(आ) भाषिक संपत्तीवर आधारित कृती शब्दसंपत्ती :**

(1) खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द लिहा : 1

(*i*) वाट –

(*ii*) नेत्र –

(2) खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून स्वतंत्र **दोन** अर्थपूर्ण शब्द तयार करा : 1

वजनदार (वजन व दार हे शब्द सोडून)

(3) खाली दिलेल्या शब्दांमधून अचूक शब्द ओळखून लिहा : 1

पक्षि/पक्क्षी/पक्षी/पक्क्षि

(4) खाली दिलेल्या विरामचिन्हांची नावे लिहा : 1

| विरामचिन्हे | विरामचिन्हांची नावे |
|---|---|
| (*i*) ? | ........................ |
| (*ii*) • | ........................ |

# 9/N 622

## विभाग-4 : उपयोजित लेखन

**4.** (अ) **पत्रलेखन :** 4

पुढील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.

(कोणतेही **एक** पत्र लिहा)

**झाडे लावा..... झाडे जगवा**

वन विभाग, औरंगाबाद
यांचे तर्फे

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त

*** रोपांचे मोफत वाटप ***

दिनांक 5 जून

संपर्क :

वन विभाग कार्यालय, उस्मानपूरा
रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद-431001
vanvibhag05@gmail.com

अन्वर/सायरा खान, न्यू इंग्लिश स्कूल, औरंगाबाद
विद्यार्थी प्रमुख या नात्याने

शाळेसाठी रोपांची मागणी करणारे पत्र वन विभाग कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना लिहा.

**किंवा**

'रोपांचे मोफत वाटप' या चांगल्या उपक्रमाबाबत वन विभाग, औरंगाबाद यांचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.

P.T.O.

Khan's Academy


**(आ)** खालीलपैकी **कोणतीही एक कृती सोडवा :** 4

(1) **कथालेखन** — खालील मुद्दे विचारात घेऊन कथालेखन करा.

एक शेतकरी — खूप कष्टाळू — दोन मुले — खूप आळशी — शेतकऱ्यास चिंता — शेतकऱ्याचे आजारी पडणे — मुलांना जवळ बोलावणे — सर्व संपत्ती शेतात असल्याचे सांगणे — शेतकरी मरण पावणे — मुलांनी शेत खणून काढणे — पण संपत्ती न मिळणे — खूप निराश होणे — चांगला पाऊस — मुलांनी धान्य पेरले — चांगले धान्य — तात्पर्य.

(2) **जाहिरातलेखन :**

दिलेले मुद्दे लक्षात घेऊन खालील विषयावर आकर्षक जाहिरात तयार करा.




Khan's Academy

(3) **बातमीलेखन :**

खालील विषयावर बातमी तयार करा :

तुमच्या शाळेत संपन्न झालेल्या 'वार्षिक पारितोषिक वितरण' समारंभाची बातमी तयार करा.

(4) **गद्य आकलन :**

पुढील उतारा वाचून एका वाक्यात उत्तर येईल, असे **चार** प्रश्न तयार करा.

मुले शाळेत आनंदाने आली पाहिजेत, म्हणून त्यांनी शाळेजवळ खेळासाठी मैदान तयार केले. खेळाचे साहित्य आणले. शिक्षकसुद्धा नेमले. पण शाळेत मुलेच येईनात. फक्त पाच-सहाचं मुले आली. बाकीची मुले रानात जात; गुरे राखत. आई वडिलांना शेतीत मदत करीत.

संत गाडगेबाबांनी सर्व गावकऱ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगितले. मग त्यांनी आपल्या मुलांना शाळेत पाठवले.




Khan's Academy

**(इ)** निबंधलेखन :

खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंधलेखन करा : 4

(*i*) **वर्णनात्मक :**




(*ii*) **आत्मकथन :**

| | |
|---|---|
| फूल | चौकटीतील घटक तुमच्याशी बोलत आहे, अशी कल्पना करून त्या घटकाचे आत्मकथन लिहा. |

Khan's Academy